**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९–०००५२–२०१९**

**नियमित दिवाणी दावा क्र.१२/२०१९**

**निशाणी क्र.११७ वरील आदेश**

प्रस्ततुचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता दाव्यात दुरुस्ती करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.२ चंद्रकांत परशुराम आयरे हे दि.१७/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र.२ चे अर्जात नमुद केल्या प्रमाणे प्रस्थावित प्रतिवादी क्र.२अ व २ब हे वारस आहेत. तरी सदर मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्डवर आणण्यास व तशी दाव्यात दुरुस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करण्यात यावा असे कथन केले आहे.

०४. अर्जाचे व म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. दाव्याचे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप, ठराव व ताकिदी करिता दाखल केलेला आहे.

०५. सदर कामी नि.क्र.१२१ येथे दाखल केलेल्या मयत प्रतिवादी क्र.२ चंद्रकांत परशुराम आयरे यांच्या मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी क्र.२ चंद्रकांत परशुराम आयरे हे दि.१७/०८/२०२५ रोजी मयत झाले आहेत. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मुदतीत दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता, मयत प्रतिवादी क्र.२ यांच्या वारसांविरुध्द प्रस्तुत दावा पुढे चालवण्याचा अधिकार वादी यांना असल्याचे दिसून येते. तसेच, न्यायालयास

परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना आणि वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपूर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायत्त्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश करत आहे.

– **आदेश** –

१. अर्ज नि.क्र.११७ मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी १४ दिवसांच्या आत सदर अर्जात नमुद केल्याप्रमाणे दावा दुरुस्ती करुन पुढील पुर्तता करावी.

SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Digitally signed by SHRIKANT SHIVPUTRA PACHANDI
Date: 2025.11.25 13:16:04 +0530

( श्रीकांत एस. पचंडी )
दिनांकः २५/११/२०२५ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड